बम बम भोलेचा गजर ....





त्र्यंबकेश्वर येथे तिसऱ्या श्रावणी सोमवारी सुमारे दोन लाख भाविकांनी हजेरी लावली. यात ५० हजार भाविकांनी ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घातल्याचा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला. पावसाच्या सरी, 'बम बम भोल'चा जयघोष आणि भक्तीमय वातावरणात भाविकांनी श्रावण महिन्यातील फेरी पूर्ण केली. त्र्यंबकेश्वर मंदिर, गोदावरी नदी उगमस्थान आणि कुशावर्तावर मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होती. बसस्थानक, पार्किंगस्थळांवर येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांची मोठी रिघ लागलेली होती.
(छाया : मोहन देवरे, सतीश देवगिरे)

# तिसऱ्या सोमवारी दोन लाख भाविक

## त्र्यंबकला भक्तिमय वातावरणात ब्रह्मगिरी प्रदक्षिणा पूर्ण

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त ब्रह्मगिरीला फेरी, कुशावर्तावर तीर्थस्नान आणि त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांची मोठी गर्दी त्र्यंबकला झाली होती. सुमारे दोन लाख भाविकांनी हजेरी लावली.त्यात सुमारे ५० हजार भाविकांनी फेरी पूर्ण केल्याचा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला.

'जय भोले, बम बम भोले, हरहर महादेव' अशा जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात भाविकांची रविवारी दुपारी त्र्यंबकला हजेरी लावण्यास सुरूवात केली होती. पावसाच्या सरी आणि ढगांची दुलईत भाविकांनी त्र्यंबक मंदिरावर आणि फेरी मार्गावर गर्दी केली होती. ` प्रदक्षिणामार्गात जोरदार पाऊस झाल्याने पायी चालणाऱ्या भाविकांना मार्ग सुकर झालेला होता. खासगी वाहनांनी आलेल्या भाविकांचे जथ्थे पार्कींग स्थळांपासून कुशावर्त, त्र्यंबकेश्वर मंदिर, ब्रह्मगिरी पर्वत आणि गोदावरी उगमस्थानाकडे रवाला होत होते. रविवारी रात्री अकरा वाजता कुशावर्तावर स्नान करून भाविकांनी 'बम बम बोले भोले हर' गजर करीत प्रदक्षिणेकडे वाटचाल सुरू केली होती. काही भाविक सकाळी नऊपर्यंत येथे परतले तर काही भाविकांनी सकाळी सहानंतर उजाडले नंतर प्रदक्षिणा सुरू केली होती. त्यामुळे त्र्यंबकेश्वर सह ब्रह्मगिरी प्रदक्षिणामार्ग पंचक्रोशीत गर्दीच गर्दी असे चित्र होते. गौतमाचा धस येथे तर दर्शनासाठी भली मोठी रांग लागलेली होती.

गौतम ऋषि दस येथे आता पायऱ्या असल्याने भाविकांना थोडी गैरसोय झाली होती. ब्रह्मगिरी डोंगरावर देखील मोठी गर्दी झालेली होती. परंतु सर्व संबंधितांनी लक्ष घातलेले असल्याने व सूचना देत असल्याने कोठेही गोंधळाची स्थिती झाली नाही. रात्री कुशावर्त तीर्थावर बारा वाजता चौकात मोठी गर्दी झाली होती. यामुळे गोंधळ होतो की काय अशी स्थिती होती. परंतु कुठेही काहीही झाले नाही.

**गर्दी नियोजनाची दक्षता**

श्रावणी सोमवारचे नियोजनात हयगय राहणार नाही याची याची काटेकोर दक्षता पोलिस, नगरपालिका, वनविभाग, स्वयंसेवी संस्थांनी घेतल्याने फेरीचे नियोजन सांघिक झाले होते. प्रशासकीय अधिकारी आणि मुख्य अधिकारी श्रिया देवचके यांनी सर्व विभागांची आढावा बैठक घेऊन शहरातील नागरिकाना यात्रेकरू भाविकांना सुविधांबाबत सूचना दिल्या होत्या. सर्व अधिकारी आणि कर्मचारी येथे तळ ठोकून होते. उपजिल्हा रुग्णालयाचे डॉक्टर , सेवकांनी यांनी प्रदक्षणा मार्गावर वैद्यकीय पथकांनी सेवा दिली. तालुका आरोग्य विभाग यांनी संबंधितांना सूचना दिलेल्या होत्या. जिल्हा पोलीस प्रमुख बाळासाहेब पाटील तसेच सहकारी अधिकारी आदित्य मिरखेलकर, या वरिष्ठांसह वासुदेव देसले, महेश कुलकर्णी यांनी पोलीस बंदोबस्ताचे नियोजन केलेले होते. एस. टी. महामंडळाने भरपूर गाड्या सोडून भाविकांची मोठी सेवा केली. वन विभागाचे कर्मचारी वनविभागाचे प्रमुख अधिकारी वरिष्ठ अधिकारी देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरी प्रदक्षणा मार्गावर येथे तैनात होते. याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाने मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे बुजवले होते. त्यामुळे अडचण आली नाही.

## ज्योतिर्लिंगाची देवस्थानकडून महापूजा



**त्र्यंबकेश्वर ।** त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट विश्वस्त मंडळाच्या वतीने अध्यक्ष व न्यायाधीश सचिन भन्साळी यांनी सपत्नीक महापूजा केली.

नगरपालिका मुख्याधिकारी व देवस्थानच्या विश्वस्त श्रिया देवचके पतीसह जोडीने, विश्वस्त कैलास घुले, विश्वस्त स्वप्निल शेलार, विश्वस्त रूपाली भुतडा, विश्वस्त प्रदीप तुंगार, विश्वस्त सत्यप्रिय शुक्ल, विश्वस्त पुरुषोत्तम कडलक यांनी जोडीने अभिषेक केला. विश्वस्त व पुरोहित संघाचे प्रतिनिधी मनोज थेटे तसेच सहकारी पुरोहित सदस्य यांनी पूजेचे पौरोहित्य केले. मंदिराला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. त्यामुळे मंदिर परिसर लक्षवेधी ठरला होता.

# ड्रोनद्वारे शिवभक्तांना सूचना; पोलिसांचे नियोजन

**नाशिक। प्रतिनिधी**

ग्रामीण पोलिसांनी तिसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त त्र्यंबकेश्वरात आलेल्या लाखो भाविकांच्या सुरक्षेवेळी 'ड्रोन'द्वारे सूचना दिल्या. तसेच, मंदिरासह कुशावर्ताजवळील भागात गर्दी नियंत्रणासाठी 'एआय' कॅमेऱ्यांचाही वापर करण्यात आला. त्यानुसार दुपारी बारा वाजेपर्यंत दोन लाख भाविकांची नोंद पोलिसांनी केली. तर रात्री उशिरापर्यंत हा आकडा तीन ते साडेतीन लाखापर्यंत पोहोचल्याचा दावा सुरक्षा यंत्रणांनी केला.

त्र्यंबकेश्वराचे दर्शन व ब्रह्मगिरी पर्वताला फेरी मारण्यासाठी लाखो भाविकांनी रविवारी (दि. १०) सायंकाळपासून त्र्यंबकेश्वरकडे मार्गस्थ होण्यास सुरूवात केली. यात विशेषत: नाशिक, धुळे, मालेगावातील महिला-पुरुष आणि तरुणाईची संख्या लक्षणीय होती. त्यामुळे रविवारपासून सोमवारी मध्यरात्रीपर्यंत पोलिसांनी खडा पहारा दिला. दरम्यान, ज्या ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त गर्दी असेल, तेथील भाविकांना बाहेर काढण्यास प्राधान्य व ज्या ठिकाणी मध्यम स्वरूपात गर्दी असेल, त्या भागात 'स्टॉप अँड रीलिज' ही पद्धती वापरण्याची चाचपणी त्र्यंबकेश्वर मंदिरासह कुशावर्त परिसरात करण्यात आली. यादरम्यान, काही तांत्रिक अडचणी समोर आल्या. त्या नोंद करून भविष्यात खबरदारी घेण्याचे प्रयत्न केले जाणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या आदेशान्वये त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक महेश कुलकर्णी व पथकाने परिसरासह फेरी मार्गावर चोख बंदोबस्ताचे नियोजन केले होते. किरकोळ अपवाद वगळता कुठेही गंभीर घटना झाली नसल्याची नोंद ग्रामीण पोलिसांच्या नियंत्रण कक्षात करण्यात आली.

**पुनरावृत्ती टाळण्याचा प्रयत्न**

बाळासाहेब पाटील हे त्र्यंबकेश्वरात तळ ठोकून होते. श्रावणातल्या दुसऱ्या सोमवारी म्हणजेच (दि. ४) त्र्यंबकेश्वरमध्ये प्रचंड गर्दीमुळे यंत्रणांनी केलेल्या नियोजनाच्या अभावाचे पितळ उघडे पडले होते. तेव्हा 'व्हीआयपी' ताफ्यामुळे झालेल्या कोंडीमुळे भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला. त्यामुळे तिसऱ्या सोमवारी (दि. ११) पोलिसांनी विशेष खबरदारी घेतल्याचे दिसून आले.

### वाहनतळाचा निर्णय

- नाशिक शहरातून त्र्यंबकेश्वरकडे जाण्यासाठी सिटी लिंकसह शटल बसेस
- शहरात वाहनतळांबाबत फलक; मार्ग दर्शविण्यासाठी 'साइन बोर्ड'
- त्र्यंबकेश्वरमार्गे जव्हार व जव्हारकडून त्र्यंबकेश्वरमार्गे नाशिककडे येणारी वाहतूक बंद
- खंबाळे पार्किंगपासून राज्य परिवहन महामंडळाच्या 'शटल बस'
- जव्हार व गिरणारेमार्गे त्र्यंबकेश्वरमध्ये येणाऱ्यांसाठी अंबोलीत वाहनतळ
- मुंबई, इगतपुरी, घोटी, वैतरणामार्गे येणाऱ्यांसाठी पहिने टी-पॉइंटजवळ पार्किंग



सिंहस्थपूर्वी त्र्यंबकेश्वरमधील गर्दी नियंत्रणासंदर्भात विशेष दक्षता घेत आहोत. तिसऱ्या श्रावण सोमवारी दोन 'ड्रोन' द्वारे गर्दी नियंत्रणावर लक्ष होते. एका 'ड्रोन'मार्फत गर्दी मोजण्यात आली. तर दुसऱ्या 'ड्रोन'द्वारे मंदिरासह परिसरात उद्घोषणा करीत भाविकांना सूचना देण्यात आल्या. आतापासूनच योग्य व अचूक नियोजनावर भर देत आहोत.

**■ बाळासाहेब पाटील,** पोलीस अधीक्षक.

# सहकारातील सेवाभावी कर्मयोगी : मोहनलाल कुमट

नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सतत तत्पर असलेले हे कुमटजी ९१ वर्षांतही सामाजिक, सहकार, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रांत आजही सक्रिय कार्य करत आहेत. सहकारी क्षेत्रातील एक आदरणीय व्यक्तिमत्व अशी त्यांची ओळख आहे. निष्काम सेवा, सर्वांचे कल्याण, सकारात्मक दृष्टी, वसुधैव कुटुंबम भावना यामुळे ते सर्वांचे चाहते बनले आहेत. साधी राहणी, उच्च विचारसरणी, हातात लहानशी बॅग, प्रत्येकाला भेटणारे, सर्वांच्या सुख दुःखात रमणारे, सर्वांना यशस्वी जीवनाचे रहस्य सांगणारे, निरोगी शतायुकरिता व्यायाम योग, आसनाचे महत्व प्रतिपादन करणारे, आर्युर्वेदिक आजीच्या बटव्यातील औषध सल्ला देणारे, मोहनलालजी कुमट महाराष्ट्र शासनाच्या विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून कार्यरत होते. सहकार क्षेत्राचा गाढा अभ्यासक मोहनलालजी मे. बलदोटा ब्रदर्स आयर्न ओर एक्सपोर्टस मुंबई ग्राहक भांडार व डिपार्टमेंटल स्टोअर्स नाशिक, दि नाशिक मर्चन्टस को ऑप, बँक लि. मल्टीशेड्युल्ड बँक नाशिक, चांदवड येथील श्री. नेमिनाथ जैन संस्था ब्रह्मचर्याश्रम, दि. पिंपळगांव मर्चन्टस को ऑप .बँक, दि नाशिकरोड देवळाली सहकारी बँक लि. या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते.



आपले ज्ञान व अनुभवाचा त्यांना त्यांची प्रगती वृध्दींगत करता आली. अनेक संस्थावर प्रभावीपणाने मोहनलाल कुमट यांनी काम केले. नाशिक मर्चंट को ऑप. बँकेचे माजी तज्ज्ञ संचालक म्हणूनही काम करुन बँकेच्या प्रगतीला हातभार लावला. त्यांना अनेक संस्थांकडून जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांना निरोगी शतायू आयुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**■ भास्कर शिंदे,** मुख्य कार्यकारी अधिकारी श्री महेश सहकारी बँक नाशिक.

# शिवसेनेच्या महाआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**नाशिक ।** शिवसेनेचे उपमहानगरप्रमुख नाना काळे यांच्या वतीने गंजमाळ परिसरातील रोटरी क्लब सभागृहात महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

त्यास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ.अनिरूध्द धर्माधिकारी यांनी शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी माजी खासदार हेमंत गोडसे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, मंगलसिंग संजय चव्हाण, राजेद्र लोखंडे सचिन भोसले, रोशन शिंदे, उमेश चव्हाण आदी उपस्थित होते.

डॉ. अनिरूध्द धर्माधिकारी, डॉ. सुनील शहा, डॉ. शैलेश बोदार्डे, डॉ. प्रशांत बिर्ला, डॉ. पुनित शहा, डॉ. राहुल सोनवणे, डॉ. हनुमान डोळस यांनी रुग्ण तपासणी केली.



# वखार महामंडळाचा वर्धापनदिन

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा ६८ वा वर्धापन दिन विभागीय कार्यालयात साजरा करण्यात आला.

कार्यक्रम अध्यक्षस्थानी अभिमन्यू काशीद, तर प्रमुख पाहुणे म्हणून नितेंद्र पानपाटील, गौरवसिंग सूर्यवंशी, विभागीय व्यवस्थापक किरण उगले, शेतकरी, व्यापारी व शेतकरी उत्पादक कंपनींचे प्रतिनिधी उपस्थित होते. आर्थिक वर्षातील सर्वोत्कृष्ट वखारकेंद्र म्हणून ओझर वखार केंद्राला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट ठेवीदार म्हणून लासलगाव वखार केंद्रावरील भूषण नेवगे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विविध मुद्द्यांवर बखार महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक, कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.


कार्यक्रमात वखार महामंडळाच्या कार्याची ध्वनी चित्र फीत दाखविण्यात आली. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांकडून तसेच वखार महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक यांचेकडून सर्व शेतकरी, व्यापारी, शेतकरी उत्पादक कंपन्या व औद्योगिक कंपन्या यांनी महामंडळाच्या विविध सोयीसुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# गो. ह. देशपांडे वक्तृत्व स्पर्धा

**नाशिक ।** नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित माजी खासदार कै. गो. ह देशपांडे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. २४) पेठे विद्यालयात करण्यात आल्याची माहिती मधुवंती देशपांडे यांनी दिली.

स्पर्धेचे हे ५६ वे वर्ष आहे. तीन गटांमध्ये मराठी व इंग्रजी दोन भाषांतून स्पर्धा पार पडेल. इयत्ता आठवी ते दहावी वर्गासाठी ग्रामीण भागासाठी वेगळा गट करण्यात येणार आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, उत्तेजनार्थ, स्मृतिचिन्हे, प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहेत. स्पर्धेची अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी स्पर्धकांनी मधुवंती देशपांडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले.


## शब्दकोड :३२५



**आडवे शब्द :** १) माणसांनी तयास केलेले ४) रात्रदिवस ९) पर्वत १०) राम सितेची जुळी मुले १२) वैताग, वारा १३) विषमच्या विरूद्ध १४) माळ, हार १५) आठवण १६) पृथ्वी १९) नविन जन्माला आलेले मुल २२) माणशी प्रमाण २३) दरवाजा २४) पती – पत्नी २७) मीठ २८) कुसळ, खुंट, बारीक अग्र ३०) रात्र ३१) फेटा ३३) कर्णभुषण ३४) धर्मातील पोटभेद ३५) बातमी, वृत्त ३८) आगीचा आच ३९) नुतन ४०) दुसऱ्यासाठी केलेला खर्च ४२) व्याज आकारण्याची दरसाल दर शेकडा पद्धत ४५) दारावरील खुणेचा आवाज ४९) मनुष्य प्राणी ५०) कणीदार ५१) डोक्याखालचे शरीर, व्यवस्थित ५२) एक चतुर्थांश भाग ५४) इतर, दुसरा ५५) रेशीमाचे जाडसर कापड ५७) प्रहार, घाव ५९) सरळ लांब वासा ६१) बाई ६२) एकत्र जमलेल्या लोकांचा समुदाय ६५) गाजावाजा ६७) एक पालेभाजी ६९) मान खाली घातलेला ७२) उत्तराधिकारी ७४) अस्सल सामान, वस्तू ७५) अथवा, किंवा ७६) पाण्याची तोटी ७७) फुरसत ७८) डोळे

**उभेशब्द :** १) मान मरातब २) शहर ३) सराव, व्यसन ५) मृत्युदेवता ६) दीपक ७) वतन असलेला ८) **** गंमत १०) खोडातील द्रव ११) एक ऋतू १३) शिक्षा १७) तात्पर्य १८) कृष्णा काठचे देवळांचे गाव २०) नवरदेव २१) तसराळे २५) वधुवरची मिरवणूक २६) नवरा २८) छातीतून निघणाऱ्या भीतीचा आवाज २९) अखंड ३२) गाई, म्हशीचे घर ३४) जपा, एक फूल ३६) वात्रट ३७) पदवीधारण केलेला ४१) मोका, संधी ४३) सामान्य ४४) अखेर ४६) हात ४७) टवाळी करणारा ४८) वेदना, खटका ५३) वस्ती ५६) फळातील द्रव ५७) वारंवार ५८) चापबाण ६०) संताप ६१) नर्तक (चे) ६२अ)आदर, शरीराचा डोक्याखालचा एक महत्त्वाचा भाग ६३)इनाम, अब तुम्हारे हवाले.....साथियों ६४)महागच्या विरुद्ध ६६)रानरेडा, दाजीपूरच्या अभयारण्यात आढळणारा एक प्राणी ६८) वर्तूळ ७०) घाण ७१) सत्व ७३) पडसे

### शब्दकोड३२४चे उत्तर



# सोन्यासारखी माणसे शोधा : देवरे

**नाशिक । प्रतिनिधी**

प्रत्येक गावाच्या उत्कर्षासाठी अनेक व्यक्तींनी स्वतःचे आयुष्य पणाला लावलेले असते. अशा व्यक्तिमत्त्वांमुळेच गाव प्रगतीपथाकडे जात राहते. गावात असणारी अशी सोन्यासारखी माणसं शोधता आली पाहिजे, असे प्रतिपादन कामगारभूषण पोपटराव देवरे यांनी केले.

गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित पुस्तकावर बोलू काही या उपक्रमात उमराणा भूषण या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दतात्रय जाधव यांनी होते.

योगेश कापडणीस आणि विलास गोडसे यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर वैजयंती सिन्नरकर यांनी आभार मानले.

## मुरलीधराचे अर्धनारी नटेश्वर रूप



कापड बाजारातील श्री मुरलीधर मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सवा-निमित्त मुरलीधराचे अर्धनारी नटेश्वर रूप (छाया : सतीश देवगिरे)